जिल्हा परिषदेच्या ताब्यातील जमिनीवरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणाबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक, क्र. जिपशा १०८९/सीआर ४४७१/२६,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. दिनांक: १७ जून १९९३.

वाचा:-शासकीय परिपत्रक, क्र. ग्राम विकास विभाग, क्र. जिघज १०८९/सीआर ३९५६/२६, दिनांक २५ जानेवारी १९९०.

परिपत्रक

शासनाच्या वर नमूद केलेल्या परिपत्रकाअन्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती यांचेकडील खुल्या जागा व इमारती यांचे अतिक्रमणापासून रक्षण करणे व त्या वरती अनधिकृत बांधकाम होवू न देण्याबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही, असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत पुनश्च याद्वारे सर्व जिल्हा परिषदांना आदेश देण्यात येत आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समितीकडे" महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम, १९६१" च्या कलम १०० नुसार हस्तांतरित झालेल्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी त्या योजनांबरोबर इमारती व खुल्या जागासुध्दा जिल्हा परिषदेकडे/पंचायत समितीकडे वर्ग झालेल्या आहेत. यामध्ये प्राथमिक शाळा इमारती, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, पशुवैद्यकीय दवाखाने, समाज मंदिरे, रस्ते इ. अनेक गोष्टींचा समावेश असतो. अशा प्रकारे हस्तांतरीत योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या इमारती/जागा या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या नसतात. त्या शासकीय मालकीच्या असतात. सदर इमारती/जागा यांचा वापर, जिल्हा परिषद कायदा कलम १००, १२९ नुसार केवळ त्या योजनेच्या प्रयोजनासाठी त्या त्या संबंधित शासकीय विभागांच्या सूचना/निदेशानुसार करावयाचा आहे. याप्रमाणे कार्यवाही न केल्यास/त्याबाबतच्या अटींचा भंग केल्यास सदर इमारती/जमिनी पुनश्च शासनाकडे निहित होतात.

आता शासन याद्वारे अशा सूचना देत आहे की, जिल्हा परिषदेकडील कोणतीही जमिन अथवा इमारतींचा वापर बदलावयाचा असल्यास किंवा त्यांचे हस्तांतरण करावयाचे असल्यास किंवा अशा जमिनीवर कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी शासनाची पूर्व मंजूरी घेण्यात यावी. शासनाकडे मंजूरीसाठी असा प्रस्ताव पाठविण्यापूर्वी त्या त्या संबंधित शासकीय विभागांच्या क्षेत्रीय कार्यालयांची मान्यता/अभिप्राय घेण्यात यावेत.

जिल्हा परिषद, पंचायत समित्या अथवा ग्रामपंचायतींच्या ताब्यातील कोणतीही जमिन अथवा इमारतीवर यापुढे अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. तसेच यापूर्वी झालेले अतिक्रमण दूर करणेसाठी

....२

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम २०० अन्वये आवश्यक कारवाई करावी. आवश्यक वाटल्यास यासाठी महसूल व पोलिस यंत्रणेची मदत घेण्यात यावी.

या सूचना आपल्या जिल्हा परिषदेअंतर्गतच्या सर्व पंचायत समिती, ग्रामपंचायती यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[धृ. श्रा. आहेर]
वरिष्ठ लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,